-:: प्रकरण-सात ::-

उपसंहार

## प्रकरण - सात.

## उ प सं हा र

धंदे व व्यवसायाना मानवी जीवनांत अत्यंत महत्वाचे स्थान असते. व्यक्तीचे श्रम किंवा त्यांची सेवा यावर व्यक्तीचे जीवन अवलंबुन असते. एवढेच नव्हेतर समाजाची आर्थिक उन्नत्ती देखील मानवाच्या श्रमावर अवलंबून असते. प्राचीन काळापासून महाराष्ट्रातच नव्हे, तर भारतात देखील शेती हा एक महत्वाचा व्यवसाय गणला गेला आहे. शेतीला भारताच्या आर्थिक जीवनात अनन्य साधारण महत्व होते. महाराष्ट्रात देखील प्राचीन काळापासून पेशवेकाळापर्यंत शेती हा एक प्रमुख व्यवसाय होता. प्राचीन महाराष्ट्रात तांदुळ, कापूस, हरभरा, मुग, मसूर, गहू , तीळ, मोहरी, जव, ऊस इत्यादी पिके घेतली जात. यादवकाळात व शिवकाळात देखील शेती व्यवसायाची सुधारणा करण्याचे प्रयत्न करण्यात आले. प्राचीन व मध्ययुगीन काळातील शेती ही मुख्यत: पावसाच्या पाण्यावर अवलंबून असे. पाऊस झाला नाही तर शेतक-याना दुष्काळासारख्या संकटाना तोंड द्यावे लागे. शेती हा प्रमुख व्यवसाय असला तरी शेतक-याना सुतार, लोहार, चांभार इ. ग्रामसेवकांवर अवलंबून रहावे लागे. ग्रामसेवकांना त्यांच्या सेवेच्या मोबदल्यात दरवर्षी सुगीच्या हंगामा-नंतर ठराविक धान्य देण्यात येत असे. याच पध्दतीला पुढे मध्ययुगीन काळात महाराष्ट्रात "बलुतेदारी पध्दती" म्हणण्यात येऊ लागले. खेडयातील जीवन स्वयंपूर्ण बनविणे हा या पध्दतीचा मुख्य उद्देश होता. प्राचीन काळापासून महाराष्ट्रात सोनार, लोहार, चांभार, सुतार, कुंभार इत्यादी ग्रामसेवक अस्तित्वात असलेले दिसतात.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

या व्यवसायिकांशिवाय प्राचीन व मध्ययुगीन महाराष्ट्रात तेली, वाणी, माळी, कोळी, पाथरवट, गवंडी, वैद्य, विणकर, शिंपी, हस्तीदंताचा व्यवसाय करणारे इत्यादी लोक समाजाच्या विविध गरजा पु-या करीत असत.

प्राचीन व मध्ययुगीन काळाप्रमाणे पेशवेकाळातही शेती हा महत्त्वाचा व्यवसाय होता. उद्योगधंदे व्यापार आणि इतर व्यवसाय यांना दुय्यम दर्जाचे स्थान होते. शेती उत्पादनावरच गावचे अधिकारी, मिरासदार, बलुतेदार व अलुतेदार इ. लोकांचे जीवन अवलंबून असे. शेती ही मुख्यत: पावसाच्या पाण्यावर अवलंबून असे. जमीनीची सुपीकता, निसर्गाची अनुकुलता, मानवी कष्ट, जमीनीला होणारा कृत्रीम पाणीपुरवठा, सुधारित शेती अवजारे इ. गोष्टीवर पीक पाण्याची उत्पादन क्षमता अवलंबुन असे. धान्य, तेलबिया, पालेभाज्या नगदीपीके यांचे उत्पादन महाराष्ट्रात होत होते. रब्बी हंगामात नागली, जवस, उडीद, भात, ऊस, कापूस, ज्वारी, बाजरी, कूळीते इ. पीके घेतली जात. तेलबियात जवस, करडी, भुईमुग, एरंड, मोहरी यांचा समावेश होत असे. फळफळा-वळात आंबा, चिंच, नारळ, केळी, पेरु यांचा समावेश होत असे. शेतातील उत्पादन आर्थिकदृष्टया महत्वाचे असल्याकारणाने पेशव्यानी जास्तीत जास्त जमीनी लागवडीखाली आणण्याचे धोरण स्विकारले होते. कृत्रीम पाणीपुरवठा करण्यासाठी पाटबंधारे,कालवे बांधण्याचे काम करण्यात येई. कांही वेळेला पाटबंधाराच्या कामासाठी गावकरी स्वत: खर्च करीत असत.

परचक्र, पावसाचा लहरीपणा, सैन्याची धामधुम इत्यादी गोष्टीमुळे

शेतक-याची अनेकदा दुर्दशा होत असे. शेतीच्या संरक्षणासाठी पेशव्यानी महसुलात सूट, इस्तावा, कौल, धान्याची आयात इ. गोष्टीकडे जातीने लक्ष दिले होते. दुष्काळ, परचक्र यासारख्या कारणाने शेतक-यास झळ पोहचल्यास सरकारकडून नुकसान भरपाई दिली जाई. ज्या शेतक-याना बैल, शेती-अवजारे, बी-बियाणे घेण्यासाठी पैसा नसे त्याना सरकारातून कर्ज मिळे. त्याला तगाई म्हणत. दुष्काळ पडला असता महसुलात कांही प्रमाणात सूट देण्यात येत असे. अशाप्रकारे शेतीधंदाला प्रोत्साहन देणारे पेशव्यांचे धोरण होते.

शेती हा जरी महत्वाचा व्यवसाय असला तरी शेतीच्या गरजा पु-या करणारे कांही व्यवसाय व धंदे देखील महत्वाचे होते. या व्यवसायिकांना बलुतेदार म्हणत असत. श्रमाचा मोबदला म्हणून त्याना सुगीच्या हंगामात धान्य उत्पादनाचा ठराविक भाग दिला जाई. या पध्दतीला बलुते पध्दती म्हण्टले जाई. बलुतेदाराप्रमाणे अलुतेदार हे दुय्यम प्रतिचे सेवक होते. बलुतेदार वर्गात महारा , मांग, चांभार, सुतार, लोहार, सोनार, कुंभार, परीट, न्हावी, कोळी, जोशी, मुलाणा यांचा समावेश होत असे. बलुतेदारी पध्दतीविषयी वेगवेगळ्या विद्वानांनी वेगवेगळे मते मांडली आहेत. बेडन पावेलच्या मते ही पध्दत आर्यानी द्रविडांकडून उच्लली. तर अळतेकरांच्या मते ही पध्दत भारतात आर्यानी सुरु केली. कार्ल मार्क्सने या पध्दतीविषयी " This dozen of individuals is maintioned at the expense of the whole Community." असे म्हटले आहे. मॅक्स व्हेबर या जर्मन समाज शास्त्रज्ञाने ग्रामसेवकाच्या चाकरीला "डेमी अर्जीकल लेबर" असे नांव दिले आहे. कारागीर आणि सेवा करणा-याना त्यांच्या कामाबद्दल वैयक्तीकरित्या वेतन मिळत नाही.

पण गावच्या जमीनीचा कांही भाग व गावच्या उत्पन्नाचा वाटा हा कामाचा मोबदला म्हणून मिळे. हे ग्रामसेवक म्हणजे प्रामुख्याने भुदास होत. यालाच "डेमी अर्जिकल लेबर" असे मॅक्स वेबर म्हणतो. मॅक्स वेबरचा हा "डेमीअर्जिकल लेबरचा" सिध्दांत वायझर याना मान्य नाही. यांनी उत्तरेतील खेडयांचा अभ्यास करुन " दि हिंदु जजमानी सिस्टीम " नावाचा ग्रंथ लिहीला. या पध्दतीनुसार गावाचा प्रत्येक कारागीर अथवा ग्रामसेवक कांही ठराविक कुटुंबाची ज्याला यजमान म्हणता येईल.-- सेवाचाकरी करतो व त्याच्याकडून वर्षाअखेरी मिळणा-या मोबदल्यावर आपली गुजराण करतो. डॉ.हिरोशी फुकाजावा यानी महाराष्ट्रातील बलुतेदार पध्दती ही डेमी अर्जिकल पध्दतीची होती असा अभिप्राय दिला आहे. जजमाणी पध्दत ही फार तर पुरोहीत वर्गापुरती लागू पडेल पण बारा बलुतेदाराना लागू करता येणार नाही असे त्याचे मत आहे. डॉ. अ.रा.कुलकर्णींच्या मते या दोन्ही पध्दतीचा संगम महाराष्ट्रात आढळतो. खेडे हे लहान असेल तर ग्रामसेवकांना सर्व गावक-यांची सेवा करणे शक्य असे. पण खेडे मोठे असेल तर एकाच व्यक्तीकडुन गावचे काम होणे शक्य नसे. मोठया गावाला अधिक कारागीर लागत. प्रत्येकाची गि-हाईके बांधुन दिली जात.[१]

बलुतेदारात महार हा ग्रामसेवक महत्वाचा होता. गावकीची बरीच कामे तो करीत असे. दोर बनविण्याचे व इतर कामे मांग करीत असे. चपला व चमडयाची कामे चांभार करीत असे. शेतीची अवजारे बनविणे व इतर लाकुड काम सुतार करीत असे. मातीची भांडी व इतर कांही कामे कुंभार करीत असे. शेतीसाठी लागणारे लोखंडी अवजारे करणे व दुरुस्तीची कामे लोहार करीत असे. परीटाचे काम म्हणजे जे गावातील

लोकांचे कपडे धुणे होय. तर गावक-याची हजामत, दाढी, नखे कापणे, इत्यादी कामे न्हावी करीत असत. चांदीचे अलंकार बनविण्याचे काम सोनार करीत असे. पेशवेकाळात सोनाराला पोतदार म्हणत असत. ते अनेक टांकसाळीमधुन कामे करीत. खाजगी टांकसाळी घालण्याचे परवाने पेशवेसरकार सोनाराला देत असे. नाणी पारखण्याचे कामही सोनार करी. गावातील देवमुर्तीची शोडषोपचारे पूजा करणे हे गुरवाचे मुख्य कर्तव्य होत. पंचाग पाहून लावणी संचनी, मुहूर्त पाहून लग्न लावणे, इत्यादी कामे जोशी करीत असत. मुलाणा या बलुतेदाराचे मुख्य काम म्हणजे गावातील मशिदी, पिर, यांची व्यवस्था पहाणे होय.

बलुतेदाराच्या जाती आणि व्यवसाय यामध्ये अत्यंत घनिष्ट संबंध होता. प्राचीनकाळी जातीवरुन व्यवसाय बनले की, व्यवसायावरुन जाती बनल्या हे सांगणे कठीण आहे. पण नेसफिल्डसारख्या समाज शास्त्रज्ञांच्या मते जातीजातीतील भेदांचा एकमेव आधार म्हणजे व्यवसाय होय. इतर कांही विद्वानांच्या मते जाती व्यवस्थेच्या निर्मितीत धंदा किंवा व्यवसाय हा एक अत्यंत महत्वाचा घटक होता. प्रत्येक जातीला त्याच्या जातीचा विशिष्ट असा धंदा करण्याची मुभा होती. उदा. कुंभार जातीचा व्यवसाय कुंभारच करीत. चांभार जातीचा व्यवसाय चांभारच करीत. चांभारांना कुंभाराचा व्यवसाय करण्याची मुभा नव्हती. तर कुंभारांना चांभाराचा व्यवसाय करण्याची मुभा नव्हती. या पध्दतीचा एक फायदा होता तो असा की, अशा व्यवस्थेमुळे प्रत्येक व्यक्तीला धंद्याची किंवा कामाची हमी दिलेली असे. पण या पध्दतीचा तोटा असा होता की, व्यक्तीला स्वत:च्या मनाला हवा तो व्यवसाय करण्याची मुभा नव्हती. या पध्दतीमुळे ग्रामसंस्थेला आर्थिक स्थैर्य प्राप्त झालेले होते असे कांही

विद्वानांचे मत आहे. अशाप्रकारे जात आणि व्यवसाय यांचे अत्यंत घनिष्ट संबंध होते.[२]

बलुतेदाराप्रमाणे अलुतेदार देखील व्यवसायिक वा कारागीर होते. त्यांच्या सेवेची जरी गावक-याना कांही प्रसंगी गरज भासत असली तरी त्यांच्यावाचुन शेतीची कामे नडत नसत. पण त्यांची गरज लक्षात असल्याने गावात राहाण्यास व उपजीविका करण्यास मुभा असे. अलुतेदारात तेली, तांबोळी, कासार, शिंपी, कोळी, इत्यादी "व्यवसायिकांचा" समावेश असे.

बांगडया विकण्याचा व्यवसाय कासार करीत. नागवेलीची पाने विकणे व आपटयाची पाने विकणे इ. कामे तांबोळी करीत. तेल काढणे आणि विकणे हा तेल्याचा धंदा होता. कपडे शिवण्याचा धंदा शिंपी करीत असे. तर कोळी गावच्या चावडीत, वतनदाराच्या घरी पाणी भरणे व मासे पकडणे इ. कामे करीत असे. बलुतेदार व अलुतेदाराचे वर्गीकरण हे ढोबळ मानाचे आहे असे म्हणावे लागले. कारण पेशवेकालीन कागदपत्रात कांही अलुतेदारांचा बलुतेदार म्हणून तर कांही ठिकाणी, बलुतेदारांचा अलुतेदार म्हणून उल्लेख आहे. यानाच कारु आणि नारु म्हटले जाई. कारुना बलुतेदार व नारुंना अलुतेदार असे म्हणण्यात येऊ लागले. अलुतेदाराप्रमाणे समाजाच्या गरजा पु-या करणारे इतर कांही व्यवसायीक पेशवेकालीन महाराष्ट्रात होते. हे व्यवसायिक म्हणजे विणकर, कलाल, पटवेगार, अत्तार, रंगारी, बुरुड, गवळी, पाथरवट इत्यादी होत. कलाल म्हणजे दारु विक्रीचा व्यवसाय करणारे लोक होत. पेशवेकाळात

दारुबंदीचे कांही प्रयत्न झाले होते. तरी दारुचा चोरटा व्यापार चालत असे. वाण्याचा व्यवसाय हा खेडेगावाच्या दृष्टीकोणातुन महत्वाचा होता. कारण अन्नधान्य जरी गावक-याना उपलब्ध होत असले तरी तेल, मीठ व इतर कांही जीवनावश्यक गोष्टींची पूर्तता वाण्यामार्फत होत असे. एवढेच नव्हे तर वाणी गावक-याना गरजेच्या प्रसंगी कर्जही देत असत. पटवेगाराचे मुख्य काम म्हणजे रेशीम धंदा होय. त्याचप्रमाणे घोडयांना सज्ज करण्यासाठी लागणारे साहित्य पालखीसाठी लागणारे साहित्य ते तयार करीत असत. सुवासिक द्रव्ये, कुंकु विकण्याचा व्यवसाय अत्तार करीत. कपडयाना रंग देण्याचा व्यवसाय रंगारी करीत. कापड रंगविण्यासाठी जे लोक निळ वापरत त्यांना निल्लारी म्हटले जाई. सुपे, टोपली इत्यादी साहित्य तयार करण्याचे काम बुरुड जातीचे लोक करीत असत. तर दुध व दुधाचे पदार्थ विकण्याचा धंदा गवळी करीत असत. घराची बांधकामे विहीरीची बांधकामे इत्यादी कामात पाथरवटांचा सहभाग असे.

कापड हे मानवी जीवनाची आणखीन एक महत्वाची गरज होय. पेशवेकालीन महाराष्ट्रात साळी, कोष्टी, धनगर इ. लोक विणकामाचा व्यवसाय करीत असत. जंगम आणि पटवेगारसुध्दा विणकामाचा व्यवसाय करीत. या सर्व जाती आपला व्यवसाय हातमागावर करीत प्रत्येक मागास सरकारला कर द्यावा लागे. वतनदाराना घोंगडी, धोतरजोडी द्यावी लागे. शिवकाळात चौल येथे रेशीम कपडयांचा धंदा संपुष्टात आला होता. तो उर्जीतावस्थेत यावा म्हणुन आंग्रेनी प्रयत्न केले. हातमागावर काम करण्या--यांचा मोठा वर्ग निर्माण झाला होता. मुंबई बंदर इंग्रजानी घेतल्यानंतर त्यांनी मुंबईत कापड धंद्याला उत्तेजन दिले आणि कोळी मुंबईत जाउन स्थायिक

झाले. १८व्या शतकात महाराष्ट्रात विविध प्रकारचे कापड तयार करण्यात येत असे.

पेशवेकाळात सावकारीचा व्यवसाय मोठ्या प्रमाणावर चालत असे. वाणी, मारवाडी, गुजर, शेटे, महाजन, देश कुलकर्णी लोक सावकारीचा व्यवसाय करीत. सावकार गरजुना पैसे कर्जाउ देत. ते फक्त सर्वसामान्यानाच कर्जपुरवठा करत असे.असे नव्हे तर पेशवे, छत्रपतींना देखील सावकार कर्जपुरवठा करीत असत. नाईक, जोशी, चासकर, दिक्षीत, पटवर्धन, परांजपे मंडळीचा व्यवसाय या काळात भरभराटीस आला होता. कांही सावकारानी पेशव्याशी वैवाहीक संबंध जोडून आपला व्यवसाय वाढविण्याचा प्रयत्न केला होता. कांही सावकार दागीने गहाण ठेवुन व्याजाने पैसे पुरवीत असत. कर्ज देताना कागदपत्रावर कर्ज घेणा-याचे नांव, कर्ज देणा-याचे नाव, व्याजाचा दर, परतफेड, तारण वस्तू इ. बाबींचा उल्लेख केलेला असे. कर्ज देण्याबरोबर हुंडी व्यवहार हे देखील सावकारी व्यवसायाचे महत्वाचे अंग होते. व्यापा-यांना हुंडीचा फार मोठ्या प्रमाणात उपयोग होत असे. पुणे हे अठराव्या शतकातील हुंडी व्यवहाराचे एक केंद्र बनले होते. पुण्यातील दिक्षीत पटवर्धनाचा सावकारी पेढीचा हुंडी व्यवहार वाराणसी, ब-हाणपूर, जालनापूर, औरंगाबाद, नाशिक, पैठण, इ. पेढयांशी होत असे. हुंडयाचे अनेक प्रकार होते. त्यामध्ये दर्शनी, मुदती हुंडी इ. हुंडया होत.

कर्जावर व्याजाचा दर विविध असल्याचे आढळते. व्याजाचा दर हा रक्कमेवर व कर्ज देणा-यावर असे. महिन्याला १ रुपया पासून ५ रुपये शेकडा व्याजाचा दर होता. वर्षाला आकारले जाणारे व्याज १२% पासुन

६० % पर्यंत असे. कर्ज देताना कर्ज घेणा-याकडून बॉन्ड किंवा वचनचिठ्ठी लिहून घेण्यात येई. या वचनचिठ्ठीचे कांही प्रकार दिसुन येतात. त्यामध्ये प्रामुख्याने कर्जरोखा, वादारोखा, शरकत रोखा, इत्यादी होत. कर्जाची वसुली सावकार नोकराना पाठवून करीत. ब्रम्हेंद्र स्वामीसारख्या धार्मिक व्यक्तीदेखील सावकारीचा व्यवसाय करत. स्वामीने पेशव्यांना ब-याचवेळा मोठ्या रक्कमा कर्जाउ दिल्या होत्या. अमात्याने सावकारी पेशाविषयी गौरवाचे उद्गार काढले. त्यांच्यामते सावकार म्हणजे राज्याची शोभा. सावकाराच्या योगाने राज्य अबादाणीत होते. राज्य श्रीमंत होते. त्यामुळे सावकाराचे संरक्षण करणे फायद्याचे आहे.

वरील सर्व व्यवसायाप्रमाणे पेशवेकाळात वैद्य व्यवसायाची देखील माहिती मिळते. पेशव्यानी वैद्यखाना निर्माण केला होता. त्यात वैद्य व हकीम होते. कांही वैद्याना राजाश्रय मिळे. वैद्याकडील औषधे स्वस्त असत. मौल्यवान औषधाकरीता सुवर्ण मौक्तीक भस्म प्रवाळ यांचा उपयोग केला जाई. कांही वैद्य गोरगरीबांना औषधोपचार करीत. त्याना सरकारातून इनामे देण्यात येत असत. अनेक वनस्पतीचा औषधासाठी वापर करण्यात येई. आवळा, मुरांबा, गोमुत्र्य , शिलजीत, हिरडे इ. वनस्पतीचा वापर औषधासाठी होत असे. त्याचप्रमाणे कवट, मुरांबा, रामटेकची पाने, बाळंतशोपा, शहाजीरे, गंधकाचा अर्क इत्यादींचा वापर केला जाई.

अठराव्या शतकात परकीय वैद्याचा महाराष्ट्रात शिरकाव झाला होता. शस्त्रक्रिया करण्यात हे वाकबगार होते. कांही पेशव्यानी परकीय वैद्याकडुन औषधोपचार घेतल्याचे उल्लेख सापडतात. वैद्यक शास्त्र आजच्या-

सारखे प्रगत नव्हते. तरीपण ब-याच रोगांवर वैद्य औषधोपचार करीत असत. या औषधांचा चांगला परिणाम होत असे असे उल्लेख सापडतात.

शेती आणि इतर व्यवसायाप्रमाणे लष्करी किंवा सैनिक व्यवसाय १८ व्या शतकात महाराष्ट्रात लोकप्रिय होता. ब-याच लोकांना या व्यवसायाचे आकर्षण होते. लष्करी पेशात घोडदळ, पायदळ, आरमार इत्यादी विभाग होते. १८व्या शतकात घोडदळाचे महत्व वाढले होते. घोडदळात शिलेदार व बारगीर हे दोन भाग असत. बारगीर म्हणजे सरकारी पगारी नोकर होते. शिलेदार स्वत:चे घोडे आणि शस्त्रासह लढायामध्ये भाग घेत असत. याबद्दल त्यांना सरकारकडून मोबदला मिळत असे. १८ व्या शतकात महाराष्ट्रातील लोक प्रामुख्याने घोडदळात नोकरी करीत असत. कांही लोक शेती व्यवसाय सांभाळून लष्करी व्यवसाय करीत असत. शिपायाबरोबरच लष्करात उंटवाले, खिजमतगार, पाणी वहानारे, न्हावी, पोतदार चांभार इ. लोकांचा भरणा असे. पेशव्यांच्या खाजगी पागेत महार, मांग, चांभार अशा विविध जातीतील लोक कामे करत असत. लष्कराची नोकरी ही बारा महिने व १० महिनाचा पगार असे. लष्करात पेंढा-याचा एक गट असे या लोकांचा व्यवसाय म्हणजे लष्करात राहून लुटमार करुन पोटभरणे होय. लढाईत शत्रुच्या पराभव फौजेची व छावणीची लुट सरकारचे सैन्य करी त्याला पेंढारी मदत करीत. पेंढा-यांना मिळालेली लुट सरकारात द्यावी लागे. पेंढा-यांना लुट करण्यासाठी सरकारातुन परवानगी मिळे. पेशवेकाळात घोडदळात मुख्य सैन्य भरती ही मराठयातुन होई. डोंगरी, मांगगासेडी याचाही सैन्यात समावेश असे. सैनिकाला लष्करी शिक्षण दिले जाई. आरमारात कोळी, भंडारी, मुसलमान इ. जातीचे लोक काम करत. आरमारात गोलंदाज,

दर्यावर्दी हे लोक नोकरीला असत. पेशव्यांकडे तोफखाना नव्हता म्हणुन त्यांनी पुण्यात तोफखाना सुरु करण्याचा प्रयत्न केला होता. त्यात सुतार, लोहार, बेलदार, घणकरी, बाणदार, शिंपी, इत्यादी लोकांचा भरणा होता. किल्ले संरक्षणाचे काम रामोशी सारख्या जाती करीत असत. किल्ल्यात हवालदार, सबणीस, कारखानीस इ. अधिकारी असत. अशाप्रकारे १८ व्या शतकातील महाराष्ट्रात विविध प्रकारचे व्यवसाय आणि व्यवसायिक अस्तीत्वात होते हे स्पष्ट होते. समाजाच्या आणि देशाच्या गरजा पूर्ण करण्याचे काम हे लोक करीत असत. शेती व शेतीवरील अवलंबीलेले व्यवसाय धार्मिक सेवा देणारे लोक, आर्थिक आणि आरोग्याच्या गरजा पु-या करणारे लोक, त्याचप्रमाणे राष्ट्राचे संरक्षण करणारे लोक हे सर्वच समाजाच्या दृष्टीकोनातून महत्वाचे होते. शेती व्यवसायाला अनन्यसाधारण महत्व होते. कारण शेतीमुळेच जनतेचा अन्नधान्याचा प्रश्न सुटत असे. त्याचबरोबर शेती योग्यरित्या करण्यासाठी सुतार, लोहार, कुंभार इ. व्यवसायिकाची भुमिका महत्वाची होती. गावातील आणि नगरातील लोकांच्या विविध गरजा न्हावी, परीट, कुंभार इ. व्यवसायिक पु-या करत. तर जोशी, मुलाणा, जंगम इ. लोक लोकांना धार्मिक सेवा देत असत. कपड्याचा मोठा प्रश्न विणकर सोडविण्याचा प्रयत्न करीत आणि आरोग्य चांगले ठेवण्यासाठी वैद्य लोक प्रयत्न करीत. व्यापार उलाढालीत आणि गरजु लोकांच्या अडचणी निवारण्यासाठी सावकार मदत करत असत.आणि देशाचे संरक्षण आणि विस्तार करण्याचे काम घोडेस्वार,पायदळातील सैनिक,आरमारातील सैनिक करीत असत. अशाप्रकारे हे सर्व व्यवसाय व धंदे आपापल्या परिने समाजाचा गाडा सुरळीत चालण्यासाठी महत्वाचे होते.

-x-x-x-x-x-


संदर्भ :

१. कुलकर्णी अ.रा., शिवकालीन महाराष्ट्र, पृ.४१,४३.

२. Desai S.V., Social life under the Peshwas, PP.15,31,52.